# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः04.01.2026** **वारःरविवार**

---

•भगवान गौतम बुद्धांनी दाखवलेला मार्ग हा संपूर्ण मानवतेसाठी असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन

•क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरातून अभिवादन; नायगाव इथं सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचं भूमिपूजन

•राज्यातल्या 29 महानगरपालिका निवडणुकीसाठी १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात

•९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा आज होणार समारोप

**<u>पंतप्रधान</u>**

भगवान बुद्धांशी संबंधित पवित्र पिप्रहवा अवशेषांच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचं उद्घाटन काल नवी दिल्लीत पंतप्रधानांच्या हस्ते झालं. पंतप्रधानांनी भगवान बुद्धांशी संबंधित प्रदर्शनाच्या विविध विभागांनाही भेट दिली आणि या प्रदर्शनाच्या सूचीचं अनावरणही केलं. भगवान बुद्धांनी दिलेलं ज्ञान आणि दाखवलेला मार्ग संपूर्ण मानवतेसाठी आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. जगभरातल्या बौद्ध वारसा स्थळांच्या विकासामध्ये योगदान देण्यासाठी भारत सातत्यानं प्रयत्नशील असून भगवान बुद्धांशी संबंधित देशातल्या सर्व ठिकाणांना जोडण्यात येत असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. यावेळी बोलताना पंतप्रधान म्हणाले..

*भगवान बुद्ध की हमारी यह साझा विरासत इस बात का भी प्रमाण है कि भारत सिर्फ पॉलिटिक्स डिप्लोमेसी और इकोनॉमी से ही नहीं जुड़ता, बल्कि हमारा जुड़ाव कहीं गहरा है। हम मन और संवेदनाओं से जुड़े हैं, हम आस्था और आध्यात्मिक से भी कनेक्ट है। साथियों भारत केवल भगवान बुद्ध के पावन अवशेषों का संरक्षक नहीं है, बल्कि उनकी परंपरा का जीवंत वाहक भी है।*

**Intro :**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त काल देशभरातून त्यांना अभिवादन करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी सावित्रीबाईंना आदरांजली वाहिली. सावित्रीबाई फुले यांचं जन्मगाव असलेल्या साताऱ्यातील नायगाव इथं क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मारक आणि महिला प्रशिक्षण केंद्राचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन झालं. महाराष्ट्रात आणि देशात स्त्री शिक्षणाची ज्यांनी सुरुवात केली, त्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचं स्मारक विषमतेविरोधात लढण्याची प्रेरणा देईल असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले...

**उबाळे-शिवराज**

राज्यातही सर्वत्र सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आलं. पुण्यातील भिडेवाडा इथं सावित्रीबाईंच्या जयंती निमित्त आंतरराष्ट्रीय काव्यजागर अभियानांतर्गत दुसऱ्या आंतरराष्ट्रीय फुले महोत्सवाचं उद्घाटन काल झालं. या तीन दिवसीय महोत्सवात महाराष्ट्रासह देश-परदेशातून ८०० कवी, साहित्यिक, विचारवंत, कलाकार यामध्ये सहभागी झाले आहेत. मुंबई, नाशिक, बीड, बुलढाणा, अहिल्यानगर, परभणी अशा विविध ठिकाणी क्रांतिज्योति सावित्रीबाई फुले यांना विविध उपक्रमातून अभिवादन करण्यात आलं.

**निवडणूक-NOA-भावसार-संध्या**

राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी, अंतिम उमेदवार यादी काल जाहीर झाली. त्यानुसार राज्यातल्या महानगरपालिकांच्या २ हजार ८६९ प्रभागांमधून १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत.

या निवडणुकीसाठी एकंदर ३३ हजार ४२७ अर्ज आले होते. त्यातले २४ हजार ७७१ अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ८ हजार ८४० उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली आहे.

राज्यात सर्वाधिक १ हजार ७०० उमेदवार मुंबई महापालिका निवडणुकीत, तर १ हजार १६६ उमेदवार पुणे महापालिका निवडणुकीत आपलं नशीब आजमावत आहेत. नागपूरमध्ये ९९३ उमेदवार आहेत. सर्वात कमी २३० उमेदवार इचलकरंजी महापालिकेची निवडणूक लढवत आहेत.

उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर ठीकठिकाणच्या लढतीचं चित्र आता स्पष्ट झालं असून आता सर्वत्र निवडणूक प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. मुख्यमंत्री आणि भाजपा नेते देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत महायुतीच्या प्रचाराचं रणशिंग फुंकलं. यंदाच्या निवडणुकीत अनेक उमेदवार बिनविरोध निवडून आल्याच्या मुद्द्यावरून राजकीय पक्षांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरू आहेत.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात.

**<u>इंट्रो-भारतजागतिकओळख-पूल-माधवी</u>**

जागतिक राजकारणात बदलत्या सत्ता समीकरणांच्या पार्श्वभुमीवर 2025 हे वर्ष जागतिक स्तरावरील भारताच्या उदयाचं निर्णायक वर्ष ठरलं. अस्थिर आंतरराष्ट्रीय राजकारणात केंद्रीय आणि स्थैर्य देणारं नेतृत्व म्हणून पंतप्रधान मोदींकडे पाहिले गेलं. ‘सुधारणांचं वर्ष’ या विशेष मालिकेत आज, जागतिक स्तरावर पंतप्रधान नरेंद्र मोदींची विकसनशील देश आणि व्यापक आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे भविष्य घडवणारा नेता म्हणून निर्माण होत असलेली ओळख, या विषयी ऐकूया माझ्या सहकारी विजयालक्ष्मी साळवी यांच्याकडून...

*जागतिक स्तरावर विकसनशील देशांचा खमका आवाज म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाहिले जाते आहे. अमेरिकेने इतर राष्ट्रांवर लादलेले आयात शुल्क असो किंवा पहलगाम हल्ला मोदींनी आंतरराष्ट्रीय स्तरावर नमते घेतले नाही. बदला घेण्याच्या भावनेने लादलेल्या शुल्कावेळीही शेतकरी आणि लहान व्यावसायिकांच्या संरक्षणाबाबतीत माघार घेतली नाही तर दहशतावादाविरोधात ऑपरेशन सिंदूर, सिंधू पाणी करार निलंबित करून राष्ट्रप्रथम हीच आग्रही भूमिका ठेवली. नरेंद्र मोदींच्या जागतिक परिस्थितीतील अढळ नेतृत्वावर परदेशांनी पुरस्कार देऊन आपली मोहोर उमटवली. गेल्या वर्षभराच्या काळात २९ आंतरराष्ट्रीय पुरस्काराने मोदींना गौरवण्यात आले, त्यामुळे त्यांच्या आर्थिक नेतृत्वापासून मुत्सद्देगिरीवर शिक्कामोर्तबच झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताने मुक्त व्यापार करारांद्वारे जागतिक व्यापाराला मुक्त द्वार दिले. यामुळे भारताला पश्चिम आणि आखाती देशांमध्ये प्रवेश मिळाला तर, युरोपियन मुक्त व्यापार संघटनेतील देशांमध्ये हरित ऊर्जा, सेवा, तंत्रज्ञानातील नव्या संधी खुल्या झाल्या. विकसनशील देशांसाठी भारताच्या सामर्थ्याचा आधारस्तंभ म्हणून भूमिका निभावताना १८ विविध देशांच्या संसदीय सदस्यांना भाषणातून प्रेरणा दिली. विश्वासार्ह, उच्चनैतिकचे आधारस्तंभ, देशासाठी जगणारा नेता म्हणून मान्यता मिळाली. आधुनिक राजकारणाची व्याख्या बदलताना, राजनैतिक शिष्टाचार बाजूला ठेवत राजकीय नेत्यांशी वैयक्तिक नातेसंबंध जोपासत खऱ्या बंधुभावाचे दर्शन घडवले. साहाजिकच, जागतिक स्तरावरील नेत्यांना त्यांच्या बंधुभावाचा सहज स्वीकार करावा लागला.*

**<u>साहित्यसंमेलन</u>**

साताऱ्यात सुरू असलेल्या 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात काल तिसऱ्या दिवशी भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल होती. कार्यक्रमात नियोजित सावित्रीबाई फुले स्मारक संकल्प चित्रफीत दाखविण्यात आली. यावेळी मुख्यमंत्र्यांसह अन्य मान्यवरांनी महिला स्वयंसहाय्यता समुहांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या प्रदर्शन आणि विक्री दालनांना भेट दिली.

या संमेलनास माजी अध्यक्षांनाही निमंत्रित करण्यात आलं आहे. संमेलनाच्या मंचावरून होत असलेल्या विचारमंथनाविषयी त्यांची मते यावेळी जाणून घेण्यात आली.

ज्येष्ठ लेखक-प्रकाशक यांच्या सत्कार सोहळ्यात जेष्ठ लेखक लक्ष्मण गायकवाड आणि ज्येष्ठ प्रकाशक बाबूराव मैंदर्गीकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. भटके विमुक्त हे शिवरायांचे खरे मावळे आहेत. मी लेखक म्हणून त्यांच्या वेदनांना शब्द देण्याचे काम करतो अशी भावना गायकवाड यानी यावेळी व्यक्त केली. बाबुराव मैंदर्गीकर यांनी आपल्या प्रकाशनव्यवसायाच्या वाटचालीचा आढावा घेतला.

मराठीला प्रकाशकांची मोठी परंपरा लाभलेली आहे. ‘उचल्या’मधून गायकवाड यांनी मांडलेली वेदना अस्वस्थ करणारी आहे. त्यामुळे अशा दोन व्यक्तींचा सत्कार होणे महत्वाचे आहे असं साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास विश्वास पाटील यावेळी म्हणाले.

गेले तीन दिवस सुरू असलेल्या या साहित्य संमेलनाची आज सांगता रविवारी होणार आहे. ज्ञानपीठ पुरस्कारानं सन्मानित रघुवीर चौधरी यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, सांगता समारंभाला उपस्थित राहणार आहेत.

**सदानंददाते**

महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला काल सेवानिवृत्त झाल्या. मुंबईत भोईवाडा इथल्या पोलीस मैदानात त्यांना निरोप देण्यात आला. राज्याच्या पोलिस महासंचालकपदी वरिष्ठ पोलीस अधिकारी सदानंद दाते काल रुजू झाले.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं, सूर्यप्रकाशयुक्त राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं , नमस्का**